कार्यकारी अभियंता / अ विभाग
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)
कुलाबा संक्रमण शिबिर, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४००००५
दूरध्वनी क्र.-०२२-२२१८७७८५ ई मेल-rreeamhada@gmail.com

जा.क्र. का.अभि./अ विभा./2173/२०२४
दिनांक 12/09/2024

ITC Cell,
M. H. & A. D. Authority
Inward No.: 3362
Date: 23.09.24

प्रति,
**ना-हरकत प्रमाणपत्रधारक;**
**१. श्री. अब्दुल्ला अब्दुल फारुख (रुम नं.३०, दुसरा मजला)**
**२. श्री.अमिर अली देखानी (रुम नं.४८, चौथा मजला)**
**३. श्री.मोहम्मद असगर शेख (रुम नं.४७, चौथा मजला)**
इमारत क्र. १९७-१९९, पी.डीमेलो रोड, फोर्ट,
मुंबई.

**वास्तुशास्त्रज्ञ,**
**मे. आर. जी.धुरी,**
६९/२९७०, एम.एच.बी.कॉलनी,
गांधी नगर, वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१

**विषय :-** उपकरप्राप्त इमारत क्र. १९७-१९९, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई च्या (परताव्यासह) ना-हरकत प्रमाणपत्राद्वारे सहाव्या टप्प्यात दुरुस्तीबाबत.
- ना हरकत प्रमाणपत्र जारी करणेबाबत.

**संदर्भ :-**
१. वास्तुशास्त्रज्ञ, मे. आर. जी.धुरी, यांचे दिनांक ०२.११.२०२२ रोजीचे पत्र व सोबत प्रस्ताव.
२. या कार्यालयाची टिप्पणी क्र. ०१३३, दिनांक ३०-०८-२०२४
३. उपमुख्य अभियंता (परि-०१) / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांचे पत्र क्र. २०२३, दिनांक ०६-०९-२०२४ अन्वये जारी करण्यात आलेले (परताव्यासह) ना-हरकत प्रमाणपत्र
४. उपमुख्य अभियंता (परि-०१) / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांचे वास्तुशास्त्रज्ञ, मे. आर. जी.धुरी, यांस पत्र क्र. २०२४, दिनांक ०६-०९-२०२४

महोदय / महोदया;

विषयांकित प्रकरणी संदर्भाधिन पत्र क्र. ३ अन्वये उपमुख्य अभियंता (परि-०१) / मुं. इ. दु. व पु. मंडळ यांचेमार्फत (परताव्यासह) ना-हरकत प्रमाणपत्र जारी करण्यात आले आहे. सदर प्रमाणपत्रातील अटी व शर्तींची प्रामुख्याने खालील अटींची पुर्तता आपण हे पत्र प्राप्त झाल्यापासुन १५ दिवसांत करावी, अन्यथा सदर ना-हरकत प्रमाणपत्र रद्दबातल करण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी.

अट क्र. १०) या कार्यालयामार्फत द्वितीय संयुक्त पाहणी करण्यात आल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येऊ नये.

अट क्र. १८) प्रस्तावित इमारत दुरुस्ती केल्यानंतर सदर इमारत सुस्थितीत येईल, या बाबत नोंदणीकृत Structural Engineer चे त्यांच्या Letter head वरिल मुळ प्रमाणपत्र व सदर Structural Engineer च्या नोंदणी प्रमाणपत्राची स्वयंसाक्षांकित प्रत अंदाजपत्रकासोबत सादर करणे आपणास बंधनकारक आहे. (प्रमाणपत्राचा मसुदा संलग्न)

अट क्र. २२) सहाय्यक लेखाधिकारी (परि-०१) / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांच्या पत्र क्र. १९४१, दिनांक ०२.१२.२०२२ अन्वये सदर इमारतीवर दुरुस्तीपोटी विविध टप्प्यांत आतापर्यंत एकुण रु.२७,१३,७२१/- (रुपये सत्तावीस लाख, तेरा हजार, सातशे ऐकवीस) इतका खर्च झाला आहे. सबब सदर झालेला खर्च व (परताव्यासह) ना-हरकत प्रमाणपत्राद्वारे प्रस्तावित दुरुस्ती कामास कमीत कमी ५१% भाडेकरु / रहिवासी यांची संमती असल्याचे प्रमाणपत्र आपण (ना-हरकत प्रमाणपत्र धारक यांनी) या कार्यालयास सादर करावे. (प्रमाणपत्राचा मसुदा संलग्न)

वरील अटी व शर्ती व्यतिरीक्त सदर कामाच्या देयकाच्या अदायगीसाठी सादर करण्यात येणाऱ्या मोजमाप वहीवर (Measurement Book) ना-हरकत प्रमाणपत्र धारकांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे, याची आपण नोंद घ्यावी.

**सोबत :-**

१) अट क्र. १८ प्रमाणे प्रमाणपत्राचा मसुदा
२) अट क्र. २२ प्रमाणे प्रमाणपत्राचा मसुदा
३) संदर्भाधिन पत्र क्र. ३ ची प्रत
४) संदर्भाधिन पत्र क्र. ४ ची प्रत

आपली विश्वासु,

12/09/24

**कार्यकारी अभियंता**
'अ' विभाग / मुं.इ.दु.व पु. मंडळ

**प्रत;**

- सहाय्यक आयुक्त / अ विभाग / बृहन्मुंबई महानगर पालिका यांस माहितीस्तव अग्रेषित.
- कार्यकारी अभियंता (शहर-२) / इमारत प्रस्ताव (दुरुस्ती व पुनर्बांधणी) / बृहन्मुंबई महानगर पालिका यांस माहितीस्तव
- कार्यकारी अभियंता / माहिती व संचार तंत्रज्ञान कक्ष, यांस माहितीस्तव व मा. मुख्य अधिकारी / मु.इ.दु.व पु. मंडळ यांच्या पत्र क्र. ६०८६, दिनांक ११.०७.२०२३ अन्वये सदर ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत म्हाडाच्या संकेतस्थळावरील दुरुस्ती मंडळाच्या Page वर Upload करण्यासाठी. (सोबत- ना-हरकत प्रमाणपत्राची छायांकित प्रत)
- सहाय्यक अभियंता (पाणी खाते) / अ विभाग / बृहन्मुंबई महानगर पालिका यांस माहितीस्तव.
- सहाय्यक लेखाधिकारी (परि-०१) / मुं.इ.दु.व पु. मंडळ यांस माहितीस्तव.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा घटक)
MUMBAI BUILDING REPAIRS AND RECONSTRUCTION BOARD
(A MHADA UNIT)

म्हाडा
MHADA

**नाहरकत प्रमाणपत्र**

( महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ कलम १०२ नुसार )

विषय :- **इ.क्र. १९७-१९९, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई अ विभाग या इमारतीचे दुरुस्ती काम(उपकर क्रमांक अ-२८५९).**

संदर्भ:- **कार्यकारी अभियंता / अ विभाग / मुं. इ. दु. व पु.मंडळ यांची कार्यालयीन टिप्पणी क्र. ET-०१३३ दि.३०.०८.२०२४.**

महानगरपालिका हद्द **अ** विभाग मधील उपकर प्राप्त **इ.क्र. १९७-१९९, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई** ला संरचनात्मक दुरुस्तीची आवश्यकता आहे, असे **वास्तुशास्त्रज्ञ मेसर्स आर. जी. धुरी,** यांनी प्रमाणित केल्यानुसार व अशी दुरुस्ती इमारतीतील भाडेकरु/ रहिवाशी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ मधील कलम १०२ नुसार मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून **ना हरकत प्रमाणपत्र (परताव्यासह)** स्वतः प्राप्त करुन घेऊ इच्छितात असा लेखी प्रस्ताव त्यांचे **वास्तुशास्त्रज्ञ मेसर्स आर. जी. धुरी,** यांनी त्यांचे पत्र **दि. ०२.११.२०२२ अन्वये का.अ./ अ** विभागास **दि.०२.११.२०२२** रोजी प्रस्ताव प्राप्त झाल्यानुसार सदर इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीसाठी, सक्षम अधिकारी म्हणून खालील अटींवर हे **ना-हरकत प्रमाणपत्र (परताव्यासह)** देण्यात येत आहे.तसेच भाडेकरु / रहिवाश्यांच्या विनंतीनुसार इमारतीची संरचनात्मक दुरुस्तीचे सर्व प्रक्रियेत खालील व्यक्ती ना-हरकत प्रमाणपत्र धारक म्हणून काम करतील व मंडळाचे दृष्टीने ठेकेदार असतील.

**१. श्री. अब्दुल्ला अब्दुल फारूख ( रुम नं. ३०, दुसरा मजला )- नाहरकत प्रमाणपत्र धारक**
**२. श्री. अमिर अली देखानी ( रुम नं.४८, चौथा मजला ) - नाहरकत प्रमाणपत्र धारक**
**३. श्री. राशिद मोहम्मद असगर शेख ( रूम नं.४७, चौथा मजला) - नाहरकत प्रमाणपत्र धारक**

<u>अटी व शर्ती</u> :-

हे ना हरकत प्रमाणपत्र कोणताही पुर्वग्रह न ठेवता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचे नकाशे व अंदाजपत्रक मंजूर करेल असे गृहित धरुन देण्यांत येत आहे. कोणत्याही कारणासाठी ज्यामध्ये नकाशे व अंदाजपत्रके न स्विकारण्याचे अटी व शर्तीचे पालन करण्यांत काही दोष रहाणे किंवा इतर कोणतेही कारण न दाखविता नाहरकत प्रमाणपत्र रदद् झाल्यास त्यामुळे कोणत्याही नुकसान भरपाईचा दावा ना-हरकत प्रमाणपत्र धारकांकडून किंवा अन्य भाडेकरु/ रहिवाश्यांकडुन स्विकारण्यात येणार नाही.

१. दुरुस्तीचे काम मंडळातर्फे नोंदणी झालेल्या ठेकेदाराकडूनच करवून घेणे ना-हरकत प्रमाणपत्र धारकावर बंधनकारक आहे. तसेच, मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र. ९२३१ दिनांक ०९/१२/२०२२ अन्वये नमुद केलेल्या अट क्र. २(i) नुसार कार्यवाही करणे बंधनकारक आहे. " **२( i ) एखाद्या दुरूस्तीच्या कामासाठी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे ठेकेदाराची नेमणूक करताना मुख्यत्यारपत्र(Power of Attorney) दुय्यम निबंधक यांच्याकडून नोंदणीकृत असणे बंधनकारक आहे."**

२. या नाहरकत प्रमाणपत्रांची मुदत ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित केलेल्या तारखेपासून दिड वर्षापर्यत ग्राहय राहिल आणि या कालावधीमध्ये दुरुस्ती काम पुर्ण करणे बंधनकारक राहिल.दिड वर्षाच्या (१८ महिने) मुदतीनंतर मुदतवाढ हवी असल्यास ना-हरकत प्रमाणपत्र धारकांनी मुळ मुदत संपण्यापुर्वी किमान १ महिना मुदतवाढीसाठी योग्य समर्थनासह मंडळास लेखी विनंती करणे आवश्यक राहिल अन्यतः हे नाहरकत प्रमाणपत्र आपोआप रदद् समजण्यांत येईल.

३. इमारत दुरुस्ती खर्चाच्या देयकाचा परतावा (Reimbursement) हा मंडळाकडे उपलब्ध असलेल्या निधीच्या उपलब्धतेवर अवलंबून राहिल.

गृहनिर्माण भवन, कलानगर, बांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी ६६४०५००० / २६५९२८७७ / २६५९१३९७
फॅक्स नं. : ०२२-२६५९२०५८/२६५९१४५९
Griha Nirman Bhavan, Kalanagar, Bandra (East), Mumbai - 400 051.
Phone : 66405000 / 26592877 / 26591397
Fax No.: 022-26592058/26591459
Website : www.mhada.maharashtra.gov.in

**इ.क्र. १९७-१९९, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई अ विभाग**
**(उपकर क्रमांक अ-२८५९), नाहरकत प्रमाणपत्र (परताव्यासह)**

४. मुंबई महानगर पालिकेच्या व मंडळाच्या मंजुरीपेक्षा अन्य काम करण्यांत आले तर नाहरकत प्रमाणपत्र रदद् करण्यात येईल व नाहरकत प्रमाणपत्रधारक आणि वास्तुशास्त्रज्ञ यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.आणि इमारत दुरुस्तीच्या केलेल्या खर्चाची परतफेड (Reimbursement) केली जाणार नाही.

५. ढोबळ नकाशात (Block Plan) मध्ये दर्शविलेल्या मजल्यांच्या संख्येपेक्षा प्रत्यक्षात मजल्यांची संख्या ढोबळ नकाशापेक्षा जास्त असेल तर सदर जास्तीच्या मजल्याची /मजल्यांची संरचनात्मक किंवा अन्य दुरुस्ती प्रथम मुंबई महानगरपालिकेच्या व तसेच मंडळाच्या लेखी पुर्व परवानगीशिवाय ना-हरकत प्रमाणपत्र धारकास करतायेणार नाही. रहिवाश्यांची संख्या का.अ./अविभाग हयांनी व वास्तुशास्त्रज्ञ हयांनी ५० भाडेकरु / रहिवाशी [**०० अ.नि. + ५० निवासी = ५० अ.नि. व नि.**] असल्याचे सादर केले आहे, ते स्विकारण्यात यावे.

इमारतीच्या बांधकाम क्षेत्रफळा बाबत जर तफावत असल्यास वास्तुशास्त्रज्ञाच्या योग्य खुलासा का. अ. / **अ** विभाग हयांनी क्षेत्रफळ तपासून, प्रमाणित करुन अंदाजपत्रक व नकाशे सादर करावे.

६. प्रत्येक भाडेकरु/रहिवाशी हयांच्या दुरुस्ती कामातील दोषांचे निरसन तसेच तक्रारींचे निराकरण ना-हरकतपत्र धारकांनी करणे बंधनकारक राहिल.

७. इमारत दुरुस्तीनंतरही भविष्यात आवश्यकता वाटल्यास मंडळाला इमारतीची पुनर्बांधणी करावयाचा अधिकार राहिल व त्याबदद्ल रहिवाशी / ना हरकत प्रमाणपत्रधारक यांना कोणत्याही प्रकारची हरकत घेता येणार नाही.

८. ज्या रहिवाश्यांना मंडळाच्या संक्रमण शिबीरांत जागा देण्यात आल्या असतील त्यांना इमारतीची दुरुस्ती पुर्ण झाल्यावर त्यांच्या मुळ गाळयात पुर्नवसन करण्यांची जबाबदारी ना हरकत प्रमाणपत्र धारकांची राहिल.

९. निधीची उपलब्धता लक्षात घेऊन धोकादायक भागांची दुरुस्ती प्राधान्याने करण्यात यावा.

१०. आवश्यक असेल तेव्हा महानगरपालिकेची आय ओ डी (Intimation of Disapproval)व सी सी (Commencement Certificate) प्राप्त झाल्यानंतर व कार्यकारी अभियंता **अ** विभाग /दु व पु.मंडळ यांनी द्वितीय संयुक्त पहाणी केल्या नंतरच कामास सुरुवात करण्यांत यावी.

इमारतीच्या दुरुस्तीचे काम आवश्यकतेप्रमाणे इमारतीच्या सर्व भागात समप्रमाणांत करण्यात यावे व ते नाहरकत प्रमाणपत्र धारकांच्या भागातच केंद्रीत होणार नाही याची दक्षता घ्यावी.

११. इमारतीचे दुरुस्तीचे काम विहित कालावधीत पुर्ण होईल याची दक्षता घ्यावी.

१२. प्रस्तावासोबत असलेल्या नकाशाप्रमाणे सामाईक भागांचे दुरुस्तीचे काम प्रथम करण्यांत यावे.

१३. लोकायुक्त महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार शक्यतो रहिवाश्यांच्या भागातील काम प्रथम करण्यांत यावे व नाहरकत प्रमाणपत्रधारकांच्या भागातील काम शेवटी करण्यांत यावे.

१४. विषयांकित इमारतीच्या दुरुस्तीचे कामासाठी मंडळातर्फे वास्तुशास्त्रज्ञाची नेमणूक झाली असल्याने त्यांनी केलेल्या टप्प्यांपर्यतच्या कामाचा मोबदला अदा करणे तसेच मंडळातर्फे ठेकेदार नियुक्त केला असल्यास त्यांचे हक्कांचे (claims) चे निराकरण करणे व सदर ठेकेदारांने मंडळातर्फे केलेलया दुरुस्ती कामासाठी केलेलया खर्चाची अदायगी करण्याची योग्य ती खबरदारी घ्यावी व त्याची पुर्तता झाली आहे याची खात्री झाल्यानंतरच मंडळाचे कार्यकारी अभियंता ना-हरकत पत्राद्वारे सुरु होणा-या दुरुस्ती कामाची द्वितीय संयुक्त पहाणी करतील व काम सुरु करण्यास अनुमती देतील.

१५. इमारतीच्या दुरुस्तीच्या कालावधीत कोणतेही अनधिकृत काम होणार नाही याची दक्षता घ्यावी व तसे आढळल्यास त्याची पुर्ण जबाबदारी वास्तुशास्त्रज्ञ व ना-हरकतपत्र धारकावर राहील व ते महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५२ अन्वये कार्यवाहीस पात्र ठरतील ना-हरकतपत्र धारकांनी याची नोंद घ्यावी व तशी स्पष्ट लेखी सुचना कामास प्रारंभ करण्यापुर्वीच ना-हरकतपत्र धारकांनी वास्तुशास्त्रज्ञ यांना दयावी.

१६. महानगरपालिकेकडे आणिबाणीच्या कालावधीमध्ये घनकचरा उचलण्याबदद्ल अनामत ठेव ठेवणे तसेच जादा पाणीपटट्री महानगरपालिकेला भरणे या जबाबदा-या ना-हरकत प्रमाणपत्र धारकांच्या रहातील.

१७. मुंबई महानगरपालिका कायदयाच्या कलम ३४२ अन्वये आय.ओ.डी.(I.O.D.)मिळविण्याकरीता खालील बाबींची पुर्तता वास्तुशास्त्रज्ञाकडून ना-हरकत प्रमाणपत्र धारकाने करुन घ्यावी.

अ) स्थळदर्शक नकाशा (लोकेशन प्लॅन)

ब) सिटी सर्व्हे शीट क्रमांकासह इमारतीचा ढोबळ नकाशा,

क) विस्तृत नकाशा आणि वेगवेगळया रंगछटांमध्ये प्रस्तावित दुरुस्ती दर्शविणारे छेददर्शक देखावे व त्याचबरोबर इमारतीचे बांधीव क्षेत्रफळ व त्यांची आकडेमोड.

ड) मंडळाचे परताव्यासह नाहरकत प्रमाणपत्र,

इ) इमारताची छायाचित्रे,

ई) महानगरपालिकेचे सर्व कर थकबाकीसह भरण्यांत यावेत व संबंधित विभागातील सहाय्यक करनिर्धारक व संकलक यांचे उपकरासह कोणतीही थकबाकी प्रलंबित नसल्याचे प्रमाणपत्र जोडणे,

उ) संबंधित विभाग अधिकारी/महानगरपालिका यांचेकडून कोणतीही कार्यवाही प्रलंबित नसल्याचे प्रमाणपत्र,

ऊ) मालमत्ता जर आरक्षणाने बाधीत असेल तर कार्यकारी अभियंता (विकास नकाशा) स.अभियंता (संपादन) महापालिका यांचे शेरे प्राप्त करुन ते जोडणे.

ए) इमारतीतील सर्व भाडेकरुंचे इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्ती करण्याकरीता लेखी हमीपत्र

१८. सदर इमारतींची दुरुस्ती केल्यानंतर इमारत सुस्थितीत येईल याबाबत नोंदणीकृत स्ट्रकचरल इंजिनियरचे प्रमाण|पत्र अंदाजपत्रकासोबत सादर करावे.

१९. कार्यकारी अभियंता अ विभाग यांनी सदर इमारतीच्या दुरुस्तीकामासाठी मंडळा तर्फे वास्तुशास्त्रज्ञ / ठेकेदाराची नेमणूक केली असल्याने संबंधित ठेकेदाराने / वास्तुशास्त्रज्ञाने केलेल्या कामाची देय रक्कम म्हणजेच त्यांनी केलेल्या कामाचे देयके पारित केल्याशिवाय व मंडळाचे ठेकेदार / वास्तुशास्त्रज्ञ यांची नियुक्ती रद्द किंवा कार्यमुक्त केल्यानंतरच नाहरकत प्रमाणपत्र धारकाचे प्रत्यक्ष दुरुस्ती काम हाती घेणे बंधकनकारक राहील. दरम्यानच्या काळात इमारत संरक्षणाबाबतची संपुर्ण खबरदारी व जबाबदारी संबधित नाहरकत प्रमाणपत्र धारकावर राहील यांची कृपया नोंद घ्यावी.

२०. सदर इमारतीच्या दुरस्तीसाठी मंडळातर्फे काम करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेले अंदाजपत्रक जर नाहरकत प्रमाणपत्र कामासाठी वापरणे प्रस्तावित असलयाने सदर बाब मंडळाचे निदर्शनास अवलोकनासाठी व मान्यतेसाठी सादर करण्यासाठी बाब टिप्पणी मंडळाचे आगामी बैठकीत सादर करण्याचे दृष्टीने कार्यवाही करावी.

२१. मुं. इ. दु. व पु.मंडळाद्वारे वि.नि.नि.३३[७] अथवा ३३[९] अंतर्गत नाहरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलेले नाही, याची खातरजमा कार्यकारी अभियंता / अ विभाग यांनी केली आहे असे गृहीत धरुन, हे नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

२२. सदर नाहरकत प्रमाणपत्र हे विषयांकीत इमारतीवर विविध टप्प्यात आतापर्यंत झालेल्या सर्वंकष दुरुस्ती खर्चाची व ५१% गाळेधारक / भाडेकरु यांची विषयांकित कामास संमती आहे याची कार्यकारी अभियंता / अ विभाग यांनी खातरजमा केली आहे असे गृहीत धरुन देण्यात येत आहे.

उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१),
मुं. इ. दु. व पु.मंडळ, मुंबई-३४.

Mumbai Building Repair & Reconstruction Board, Executive Engineer 'A' Ward,
Inward No. :- 2368
Date :- 06/09/2024

इ.क्र. १९७-१९९, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई अ विभाग
(उपकर क्रमांक अ-२८५९),नाहरकत प्रमाणपत्र (परताव्यासह)

जा.क्र.परिमंडळ-१/नाहप्र/ 2023 /२०२४.
उप-मुख्य अभियंता (परिमंडळ-१) यांचे कार्यालय,
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ,
ए-६६, दादरकर कंपाऊंड, ताडदेव, मुंबई- ४०० ०३४.
दिनांक :- 06/09/2024.

प्रति,

१. श्री. अब्दुल्ला अब्दुल फारूख ( रुम नं. ३०, दुसरा मजला )- नाहरकत प्रमाणपत्र धारक

२. श्री. अमिर अली देखानी ( रुम नं.४८, चौथा मजला ) - नाहरकत प्रमाणपत्र धारक

३. श्री. राशिद मोहम्मद असगर शेख ( रुम नं.४७, चौथा मजला) - नाहरकत प्रमाणपत्र धारक

इ.क्र. १९७-१९९, पी. डिमेलो रोड, फोर्ट, मुंबई अविभाग ( उपकर क्रमांक अ-२८५९), यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

३. प्रत, कार्यकारी अभियंता अविभाग, दु व पु.मंडळ यांस माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी (सर्व प्रतींसह). कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावासोबत सादर केलेलया नकाशामध्ये भाडेकरु / रहिवाश्यांच्या यादीनुसार खोली क्र. / दुकान क्र. नमुद करावा.

विषयांकित '' ना-हरकत प्रमाणपत्र '' निर्गमित करण्यापूर्वी उपरोक्त इमारतीच्या प्रस्तावित टप्प्याच्या दुरुस्तीसाठी यापूर्वी नियुक्ती केलेल्या कंत्राटदारास निविदेच्या संबंधित कलमानुसार कार्यमुक्त केल्याची खातरजमा करावी. तसेच ना-हरकत प्रमाणपत्रातील सर्व अटी व सुचनांचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी.

४. प्रत, सहाय्यक महानगर पालिका आयुक्त अ विभाग, मुंबई महानगर पालिका, मुंबई.

५. प्रत कार्यकारी अभियंता,(शहर-२ ) इमारत प्रस्ताव (दुरूस्ती व पुनर्बांधणी) महानगरपालिका, १/२ दोस्ती विनस, वाल्मीकी चौक, वडाला (पू ), मुंबई-३७

६. प्रत, सहाय्यक अभियंता [पाणी खाते], अ विभाग महानगरपालिका, मुंबई.

७. प्रत, सहाय्यक लेखाधिकारी ( परिमंडळ-१ )/ मुं.इ. दु. व पु.मंडळ यांना माहितीसाठी रवाना.

८. प्रति,
वास्तुशास्त्रज्ञ
मेसर्स आर. जी. धुरी,
६९/२९७०, एम. एच. बी. कॉलनी,
गांधी नगर, वांद्रे(पूर्व),
मुंबई ४०० ०५१.

उपमुख्य अभियंता ( परिमंडळ-१ )
मुं. इ. दु. व पु.मंडळ, मुंबई-३४.

No/EE/A-DIV/RR 2192 of 2024
Office of the Executive Engineer-'A' Ward
25 Transists Camp, Cuffe Parade,
Colaba. Mumbai-400 005.
Date 13/09/2024



उपमुख्य अभियंता / परि-१, दुवपु क्र. २०२३ दिनांक ०६.०९.२०२४ [ प्रत जोडण्यांत येत आहे ] मधील अटी व शर्तींच्या अधिन राहून "ना हरकत प्रमाणपत्र" [ परताव्यासह ] रवाना.

सदर अटी व शर्तीची पूर्तता आठ दिवसात करण्यांत यावी, अन्यथा सदर ना हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्दबातल होईल याची कृपया नोंद घ्यावी. या कार्यालयाचे पत्र क्र. २१७३ दि.१२.०९.२०२४ चे अवलोकन व्हावे.

13/09/24
कार्यकारी अभियंता
अ विभाग, मुं.इ.दु. व पु. मंडळ, मुंबई.